बुद्धाब्द: २५६८. आसाळ्हमासो-सावनमासो

नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्बुद्धस्स

RNI क्रमांक - MHMUL/25/A1620

4 ऑगस्ट 2025 सोमवार

संपूर्ण महाराष्ट्रातून वितरित







# त्रिपिटक वार्ता

परिवर्तनाचं पहिलं पाऊल"

"परिवत्तनस्स पठमो पादो "

वर्ष 1 ले, अंक 2

पृष्ठे 4 , मूल्य 10

साप्ताहिक

"पालि भाषेचे पुनरुज्जीवन आणि धम्म प्रचार प्रसारासाठी समर्पित" |

क्रोधावर विजय
क्रोधाने जळते अंत:करण,
शांततेत सापडते खरे धन।
रागाने नाती होतात विरून,
प्रेमाने जीवन फुलते हसून॥

अनुक्रमणिका

२ संपादकीय
२. कथा, शिलालेख
३. मुख्य लेख
३."पालि शिकूया बाबासाहेबांसोबत!"
४. बातम्या
४. वाचकांच्या प्रतिक्रिया

**बुद्धांचा एक सुंदर सुविचार**

"क्रोध म्हणजे दुसऱ्याला फेकलेलं अंगारं — पण आधी स्वत:च जळतोस."

"बुद्धत्व दूर नाही, जो जागृत आहे तोच बुद्ध आहे."

"ज्ञान हा प्रकाश आहे, अज्ञान हे अंधार."

## बुद्धांचे अस्थिकलश: एक ऐतिहासिक पुनरागमन

बुद्धांचे अस्थिकलश: एक ऐतिहासिक पुनरागमन

भारताच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक इतिहासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. तब्बल १२७ वर्षांनंतर तथागतांचे पवित्र अस्थिकलश, ज्यांना पिपरहवा अवशेष म्हणून ओळखले जाते, ते भारतात परतले आहेत. हे केवळ भूतकाळाचे अवशेष नसून, भगवान बुद्धांच्या शिकवणी आणि शांतीचा एक शक्तिशाली संदेश आहे. हा क्षण भारताची गौरवशाली सांस्कृतिक ओळख आणि बुद्ध धर्मावरील निष्ठेचे प्रतीक आहे.

पिपरहवा अवशेषांचा शोध आणि महत्त्व

इ.स. १८९८ मध्ये कपिलवस्तूच्या प्राचीन भूमीत, जिथे शाक्य कुळात तथागत गौतम बुद्ध जन्माला आले, तिथे पिपरहवा स्तूपाजवळ हे अवशेष सापडले. ब्रिटिश अभियंता विल्यम क्लॅक्स्टन पेप्पे यांनी केलेल्या उत्खननात हे अस्थिकलश, सोन्याचे दागिने आणि रत्न सापडले. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, एका कलशावर धम्मलिपी (ब्राह्मी लिपी) मध्ये एक शिलालेख कोरलेला आहे, जो हे अवशेष थेट शाक्य कुळाशी जोडतो. यामुळे या अवशेषांचे ऐतिहासिक आणि आध्यात्मिक महत्त्व अधिक वाढते.

हे अवशेष बुद्ध धम्माच्या शांती आणि करुणेच्या शिकवणींचे प्रतीक आहेत. नंतर भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने (ASI) केलेल्या उत्खननात आणखी २२ अस्थिकलश सापडले, जे सध्या दिल्लीच्या राष्ट्रीय संग्रहालयात आहेत.



बौद्ध राष्ट्रांसाठी एक आनंददायी पुनरागमन

मे २०२५ मध्ये, हाँगकाँगमधील एका आंतरराष्ट्रीय लिलावात हे अवशेष विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. परंतु, भारत सरकारने तातडीने हस्तक्षेप करून त्यांची विक्री थांबवली. भारत सरकार आणि एका खासगी संस्थेच्या सहकार्याने ३० जुलै २०२५ रोजी हे पवित्र अवशेष त्यांच्या मूळ स्थानी परत आणले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या घटनेला 'सांस्कृतिक वारशासाठी एक अभिमानाचा क्षण' म्हटले आहे.

हे पवित्र अवशेष परत आणण्याचा प्रयत्न 'विकास भी, विरासत भी' (विकासही आणि वारसाही) या तत्त्वावर आधारित आहे, ज्यामुळे देशाच्या विकासाबरोबरच त्याचा ऐतिहासिक आणि आध्यात्मिक वारसा जपण्याचे महत्त्व अधोरेखित होते.

भारताचा बौद्ध धर्म आणि जागतिक धम्म प्रसार

भारत, बौद्ध धर्माची जन्मभूमी असल्यामुळे, जगभरात शांती आणि करुणेचा प्रसार करण्याची जबाबदारी त्याची आहे. बुद्धांच्या शिकवणींनी भारताची ओळख घडवली आहे आणि आशियातील अनेक देशांशी आपले संबंध अधिक दृढ केले आहेत.

भारत सरकारने बौद्ध पर्यटन सर्किट सारख्या अनेक योजना सुरू केल्या आहेत. यामुळे कपिलवस्तू सारख्या पवित्र स्थळांचे महत्त्व वाढले आहे. अलीकडे, भारताने थायलंड, व्हिएतनाम आणि मंगोलिया सारख्या देशांमध्ये बुद्धांच्या अवशेषांचे दर्शन घडवून आणले. यामुळे जागतिक स्तरावर धम्म-बंधुत्व अधिक मजबूत झाले आहे.

भारत सरकार ग्लोबल बुद्धिस्ट समिट (२०२३) आणि एशियन बुद्धिस्ट समिट (२०२४) सारख्या आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करून बौद्ध धर्माच्या शिकवणींचा जागतिक स्तरावर प्रसार करत आहे.

बुद्धांच्या शिकवणींचे स्मरण

संस्कृती मंत्रालय वेसाक दिवस (बुद्ध पौर्णिमा), आषाढ पौर्णिमा आणि अभिधम्म दिवस अशा बुद्धांच्या जीवनातील तीन महत्त्वाच्या दिवसांचे आयोजन करते.

वेसाक दिवस: या दिवशी तथागतांचा जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाण यांचा उत्सव साजरा होतो.

आषाढ पौर्णिमा: या दिवशी बुद्धांनी सारनाथ येथे पहिला धम्म उपदेश दिला आणि धम्मचक्र प्रवर्तन झाले.

अभिधम्म दिवस: हा दिवस बुद्धांच्या गहन तात्विक शिकवणींचे स्मरण करतो

प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो (PIB) च्या प्रेस रिलीज: हे लेख तयार करण्यासाठी प्राथमिक स्रोत होते

### केंद्रीय तिबेट प्रशासनाचे पंतप्रधान पेनपा त्सेरिंग यांचा गोंदियाला भेट

नागपूर: केंद्रीय तिबेट प्रशासनाचे (CTA) पंतप्रधान (सिक्योंग) पेनपा त्सेरिंग बुधवारी गोंदिया जिल्ह्यातील गोठांगाव येथील तिबेटी वस्तीत पोहोचले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ते 1 ऑगस्टपर्यंत तिथे राहणार असून त्यानंतर ओडिशात जातील. सामुदायिक वस्तींच्या त्यांच्या अधिकृत भेटीचा हा एक भाग आहे. सीटीएने दिलेल्या माहितीनुसार, ते गोंदिया, ओडिशा आणि छत्तीसगडमधील मैनपाट येथील वस्त्यांना भेट देणार आहेत. या भेटीचा उद्देश थेट समुदाय सदस्यांशी संवाद साधणे हा आहे.

तिबेटी वसाहतीतील 'नोरगेयलिंग' वसाहतीला भेट

गोंदियामधील शिबिर 'नोरगेयलिंग वसाहत' म्हणून ओळखले जाते. 1950 च्या दशकाच्या उत्तरार्धात तिबेटी लोकांनी आपली मायभूमी सोडल्यानंतर भारतात स्थापन झालेल्या अनेक छावण्यांपैकी ही एक आहे. भारत तिबेट मैत्री संघाने भंडारा येथे आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात त्सेरिंग यांनी तिबेटींच्या समस्यांसाठी त्यांच्यासोबत उभे राहण्याचे आवाहन केले. तसेच, समुदायाच्या संस्कृतीचे जतन करण्यासाठी अनुकूल वातावरण असणे किती आवश्यक आहे, यावर त्यांनी भर दिला, असे आयोजकांपैकी एका सूत्राने सांगितले.

संवाद आणि विविध विषयांवर चर्चा

समुदायाशी संवाद साधताना ते म्हणाले की, बौद्ध धर्म धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनावर विश्वास ठेवतो आणि धर्मांचे उद्दिष्ट फूट पाडणे नाही. भारत तिबेट मैत्री संघाचे अध्यक्ष अमृत बनसोड म्हणाले की, या संवादात विविध विषयांचा समावेश होता. त्यांनी सिक्योंग यांना अमरावती येथे आयोजित करण्यात आलेल्या संस्थेच्या शिखर परिषदेसाठी आमंत्रित केले आहे.

### पालि, संस्कृत, मराठी संवर्धनासाठी सत्याग्रह महाविद्यालयात ऐतिहासिक चर्चासत्र

नवी मुंबई, खारघर (प्रतिनिधी) – सत्याग्रह महाविद्यालयाच्या शांताबाई रामराव सभागृहात पालि, संस्कृत आणि मराठी भाषांच्या संवर्धनासाठी एक ऐतिहासिक चर्चासत्र पार पडले. या चर्चासत्रात तिन्ही भाषांचा समावेश केजी ते पीजी पातळीवरील अभ्यासक्रमात करण्याचा ठराव एकमताने संमत झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. जी. के.

डोंगरगावकर होते तर उद्घाटन डॉ. राकेश शेट्टी यांच्या हस्ते झाले. प्रा. सतीश पवार यांनी पालि भाषेला मिळालेला अभिजात दर्जा ही ऐतिहासिक उपलब्धी असल्याचे सांगितले. त्यांनी तसेच अभिजात भाषांना शासनाच्या धोरणांमध्ये प्राधान्य मिळावे यावर भर दिला.मुख वक्त्यांमध्ये डॉ. निधी अग्रवाल, डॉ. प्रीती शर्मा, प्रा. रक्षा लादे, प्रा. एलोरा मित्रा, प्रा. ललिता यशवंते, प्रा. सोनाली सूर्यवंशी,



ज. मा. साबळे आणि विशेष अतिथी म्हणून रत्नमाला डोंगरगावकर उपस्थित होते.चर्चासत्रात महाराष्ट्र शासनाने अजिंठा-वेरुळ परिसरात पालि भाषा विद्यापीठ स्थापन करावे अशी मागणी करण्यात आली. तसेच सत्याग्रह महाविद्यालयाच्या वतीने भारतीय संविधानाचा पालि भाषेतील अनुवाद करून तो महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी निमित्त प्रकाशित करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प जाहीर झाला.

### लेणी संवर्धन व धम्मलिपि प्रसारासाठी 'दान पारमिता फाऊंडेशन' सन्मानित



मुंबई, प्रतिनिधी:

लेणी संवर्धन आणि धम्मलिपि शिकवण्याच्या आदर्श कार्याबद्दल दान पारमिता फाऊंडेशन ला राज्याच्या समाज कल्याण विभागाचे प्रधान सचिव आदरणीय डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. हा सन्मान महापरिनिर्वाण यात्री पुस्तक प्रकाशन सोहळ्यात प्रदान करण्यात आला.

डॉ. कांबळे यांनी फाऊंडेशनच्या कार्याची प्रशंसा करताना म्हटले, "इतिहास, संस्कृती आणि धम्मवारसा जतन करणे ही केवळ जबाबदारी नाही, तर ती समाजाप्रती असलेली एक करुणामय प्रतिज्ञा आहे. दान पारमिता फाऊंडेशनने हे कार्य अत्यंत निष्ठेने पार पाडले आहे."

समारोहात उपस्थित मान्यवरांनी फाऊंडेशनच्या लेणी संवर्धन मोहिमेचे आणि धम्मलिपि शिक्षण उपक्रमाचे महत्व अधोरेखित केले. महाराष्ट्रातील बौद्ध वारसा स्थळांवरील संवर्धन आणि धम्मलिपीचे शिक्षण यामुळे तरुण पिढीत जागरूकता वाढल्याचे सांगण्यात आले.

## संपादकीय

पाली भाषा: एक शाश्वत वारसा आणि वर्तमानाचा दीपस्तंभ

आजच्या वेगवान आणि धावपळीच्या युगात, जिथे प्रत्येक गोष्ट क्षणभंगुर वाटते, तिथे काही गोष्टी अशा असतात ज्या काळाच्या कसोटीवर टिकून राहतात आणि आपल्याला आपल्या मूळातून प्रेरणा देत राहतात. पाली भाषा ही त्यापैकीच एक आहे. ही केवळ एक प्राचीन भाषा नसून, एक विचार, एक संस्कृती आणि एक जीवनशैली म्हणून तिने आजपर्यंत स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवले आहे.

जेव्हा आपण पाली भाषेचा विचार करतो, तेव्हा आपल्या डोळ्यासमोर उभे राहतात ते भगवान बुद्धांचे शांत, करुणाशील व्यक्तिमत्व आणि त्यांनी जगाला दिलेला धम्म. पाली ही केवळ एक भाषा नाही, ती भगवान बुद्धांच्या शिकवणीचे माध्यम आहे. याच भाषेतून त्यांनी जगाला शांती, अहिंसा आणि करुणेचा संदेश दिला. आज हजारो वर्षांनंतरही त्यांचा हा संदेश जगासाठी तितकाच महत्त्वाचा आणि मार्गदर्शक आहे.

पाली भाषेचे ऐतिहासिक महत्त्व

पाली भाषेचे महत्त्व समजून घेण्यासाठी आपल्याला इतिहासाच्या पानांमध्ये डोकावून पहावे लागेल. ही भाषा प्राचीन मगध साम्राज्यात बोलली जात होती आणि तिचा विकास बौद्ध धर्माच्या प्रसारासोबत झाला. सम्राट अशोका सारख्या महान शासकाने आपल्या शिलालेखांतून याच भाषेतून जनतेला नैतिक आणि सामाजिक संदेश दिले. हे शिलालेख केवळ ऐतिहासिक पुरावे नसून, ते त्या काळातील सामाजिक, राजकीय आणि धार्मिक परिस्थितीचे ज्वलंत दर्शन घडवतात.

भगवान बुद्धांनी आपल्या शिकवणीसाठी छांदस भाषे ऐवजी पाली भाषेची निवड केली, कारण ती तत्कालीन सामान्य जनतेची भाषा होती. यामुळेच त्यांचा करुणेचा संदेश प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचला. पाली भाषेने बौद्ध धर्म केवळ भारतापुरता मर्यादित न ठेवता, तो श्रीलंका, म्यानमार, थायलंड आणि कंबोडियासारख्या देशांमध्ये पोहोचवला. या देशांमध्ये आजही पाली भाषा धार्मिक विधी, साहित्य आणि अभ्यासासाठी वापरली जाते, जी तिच्या जागतिक प्रभावाची साक्ष देते.

आजच्या काळात पालीचे स्थान

आजच्या डिजिटल युगात, जेव्हा अनेक प्राचीन भाषा लोप पावत आहेत, तेव्हा पाली भाषेचे स्थान अधिक महत्त्वाचे बनले आहे. याचे कारण केवळ तिचा ऐतिहासिक वारसा नाही, तर तिच्यात दडलेली नैतिक आणि आध्यात्मिक शक्ती आहे.

आज आपण अनेक मानसिक समस्यांना तोंड देत आहोत, जसे की ताणतणाव, चिंता आणि अशांतता. अशा वेळी, पाली साहित्यातील 'धम्मपद' आणि 'सुत्त पिटक' यांसारख्या ग्रंथांमधील शिकवण आपल्याला योग्य मार्ग दाखवते. धम्माच्या माध्यमातून व्यक्तीला आत्म-जागृती आणि आंतरिक शांतीचा अनुभव येतो. 'अत्त दीप भव' (स्वतःचा प्रकाश स्वतःच व्हा) यांसारखी वचने आजही आपल्याला स्वयंप्रकाशीत होण्यासाठी प्रेरित करतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पाली भाषा

भारतात पाली भाषेच्या पुनरुज्जीवनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान अविस्मरणीय आहे. त्यांना हे ठाऊक होते की बौद्ध धम्माची खरी शिकवण मूळ पाली भाषेतच दडलेली आहे. त्यामुळे त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यानंतर पाली भाषेच्या अभ्यासाला सर्वोच्च प्राधान्य दिले. बाबासाहेबांनी पाली भाषेला केवळ एक धार्मिक भाषा म्हणून न पाहता, तिला ज्ञानाचे आणि समतेचे साधन मानले. यासाठी, महाराष्ट्र सरकारने प्रकाशित केलेल्या १६ व्या खंडात, त्यांनी पाली भाषेची डिक्शनरी, व्याकरण आणि संभाषणासाठी आवश्यक असलेले साहित्य उपलब्ध करून दिले. जेणेकरून ते बौद्ध धम्माच्या मूळ सिद्धांतांना थेट समजू शकतील. याव्यतिरिक्त, त्यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून पाली भाषा शिकवायला सुरुवात केली, ज्यामुळे या भाषेचा प्रसार वेगाने झाला. त्यांच्या या प्रयत्नांमुळेच आज भारतात अनेक ठिकाणी पाली भाषा शिकवली जाते आणि तिच्यावर संशोधन केले जाते.

भविष्यातील वाटचाल

पाली भाषेला भविष्यात अधिक व्यापक स्थान मिळवून देण्यासाठी आपल्याला काही गोष्टींवर लक्ष केंद्रित करावे लागेल:

शैक्षणिक अभ्यासक्रमात समावेश: राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (NEP 2020) अंतर्गत पाली भाषेला शाळा आणि महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमात समाविष्ट करणे गरजेचे आहे.

डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर: पाली साहित्याचे डिजिटायझेशन, ऑनलाइन कोर्सेस आणि ॲप्सच्या माध्यमातून ती तरुण पिढीपर्यंत पोहोचवणे आवश्यक आहे.

संशोधन आणि अनुवाद: पाली साहित्याचा इतर भारतीय आणि परदेशी भाषांमध्ये अनुवाद केल्यास तिचा प्रसार वाढेल. तसेच, नवीन दृष्टिकोनातून तिच्यावर संशोधन करणे महत्त्वाचे आहे.

पाली ही केवळ एक भाषा नाही, तर एक चळवळ आहे. ती आपल्याला भूतकाळाशी जोडते आणि भविष्यासाठी दिशा देते. पाली भाषेच्या अभ्यासातून मिळणारे ज्ञान आपल्याला अधिक शांत, संयमी आणि मानवतावादी बनवते. चला, आपण सगळे मिळून पाली भाषेच्या या ज्ञानमशालला अधिक प्रकाश देऊया आणि तिचा संदेश जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचवूया.

## "सेनासन" व त्याचे बुध्द धम्मातील महत्व "

भगवान बुद्धांचा जन्म इसवी सन पूर्व 563 वैशाख पौर्णिमेला लुम्बिनी येथे झाला. कपिल वस्तू गणतंत्राचे राजे शुद्धोधन हे पिता व आईचे नाव महामाया देवी होते. बाळाचे नाव सिद्धार्थ ठेवण्यात आले. राजा शुद्धोधन हे शाक्य गणत्रंता चे प्रमुख शासक होते. माता मायादेवी कपिलवस्तु येथून आपल्या मातृगृही देवदह नगराला जात असताना मार्गात लुंबिनी वनात सुभाषीत दोन शाल वृक्षाच्या मध्ये बुद्धांचा जन्म झाला.

असीत नावाचा एक वृद्ध संन्यासी राजा शुद्धोधन याच्या महालात आले. त्यांनी नवजात बालकाला पाहिले. त्याच्या कांचनप्रभा युक्त सूर्यासारखे तळपणारे तेज बघून ते प्रसन्नचित्त झाले. त्यांच्या शरीरावरील उत्तम लक्षण बघून अत्यंत आनंदित झाले. त्या शाक्यपुत्राला बघून ते म्हणाले, सम्बोधी प्राप्त करून तो श्रेष्ठ विशुद्ध धम्मचक्रप्रवर्तन करेल. बहुजनाच्या हितासाठी त्यांच्यावर अनुकंपा करणारे होईल. त्यानंतर त्यांच्या डोळ्यातून अश्रू पडायला लागले व ते म्हणाले, या बालका व्दारे सुमधूर धम्माचे होणारे धम्मसवन मला माझ्या अति वृद्धत्वामुळे, भविष्यात जिवंत न राहिल्याने ऐकता येणार नाही.

शाक्यजन बालकाचा जन्मोत्सव साजरा करत असताना, माता महामाया देवी हिचा सिद्धार्थाच्या जन्मानंतर सात दिवसाने मृत्यू झाला. सिद्धार्थाच्या पालनपोषणा चे उत्तरदायित्व महामाया देवी ची लहान बहीण महाप्रजापती गौतमी ने स्वीकारले.

लहानपणापासूनच गौतम एकांत प्रिय गंभीर आणि मननशील स्वभावाचा होता. शुध्दोदन राजाने सिद्धार्था साठी तीन ऋतूसाठी सुखसुविधा संपन्न आणि ऐश्वर्यशाली प्रसाद बनवले. योग्यवेळी सिद्धार्थाचा यशोधरे सोबत विवाह झाला. त्या महालात नाना प्रकारचे नृत्य वाद्य, संगीताची व्यवस्था केली होती. पुढे त्यांना एक पुत्र झाला,त्याचे नाव राहुल ठेवण्यात आले. एका मध्यरात्री तरुण व रूपवान नृत्यागंना सिध्दार्थाच्या मनोरंजनासाठी प्रयत्न करताना तो अत्याधिक उद्विग्न झाला. त्याने गृहत्याग केला, त्यास "महाभिनिष्क्रमण" असे म्हणतात. सिद्धार्थ गौतम आपल्या सारथ्यासह कंथक घोड्यावर आरुढ होऊन, जंगलाकडे त्याने प्रयाण केले. अनोमिया नदीच्या तीरावर त्याने राजसी वस्त्र, लांब केस कापून, विरक्त होऊन संन्याशी वस्त्र धारण करून तो एकटाच वनात प्रविष्ट झाला.

सिद्धार्थ आधी अनार्य पर्येक्षणा करणारी व्यक्ती,स्वतः जन्म,जरा, व्याधी,मरण,शोक संक्लेश धम्माचा होऊन त्या धम्माचा शोध केला. त्यानंतर त्याने विचार केला का नाही मी आर्य पर्येक्षणा करू?

सर्वप्रथम त्याने प्रसिद्ध आचार्य आलार कलाम (पासरासिसुत्त, ओपम्मवग्ग, म.नि.-१),यांच्या आश्रमात जाऊन त्यांचा गुरु म्हणून स्वीकार केला. चित्तवृत्ती निरोध याविषयी त्यांच्याकडून बरेच ज्ञान संपादन केले. आकिञ्चञ्ञायतन या सातव्या ज्झाना विषयी त्याने खूप काही जाणले समजून घेतले. त्यानंतर त्याने दुसरे आचार्य उदक रामपुत्त ह्यांचा आश्रमात गेले. सिद्धार्थाने नेवसञ्ञानासञ्ञायतन ह्या आठव्या ज्झानाचे ज्ञानार्जन केले. पण त्याची ज्ञानपिपासा, मन शांत झाले नाही.

शेवटी ते मगधराज्यातील उरुवेला, सेनानिगम येथील सुरम्य प्रदेश ज्झानासाठी ते अत्यंत उपयुक्त स्थान होते. तिथे त्याने श्वास रहित ज्झान केले. स्वतः आहार थोडा थोडा कमी करत देह यातना करीत असताना त्याच्या शरीराने दुर्बलतेची चरम सीमा गाठली.अत्यंत कमी जेवण, एक भाताचा शित एवढे नियंत्रित केल्यावर त्याची पाठ व पोट एकमेकांना चिटकू लागले, शरीर अस्थिपंजर झाले. अनेक प्रकाराने श्वास नियंत्रित करणे, व घोर दुष्कर तपश्चर्या केली.(६.महासच्चकसुत्त, ४. यमकवग्ग, म.नि.-१). परंतु त्याला शेवटी समजले की दुष्कर तपश्चर्या द्वारे या माध्यमाने काही अलौकिक ज्ञान प्राप्त होत नाही. सहा वर्ष तपश्चर्या केल्यावर काही साध्य न झाल्याने यासाठी काही अन्य मार्ग होऊ शकतो काय ? त्या वेळी त्याचे वय 35 वर्ष झाले होते, तेव्हा त्याच्या मनात एक भाव उत्पन्न झाला,तो सम्बोधि (संपूर्ण ज्ञान) प्राप्त करील. (१.बोधिकथा,१.महाक्खंधकपालि, महावग्ग). त्याच दिवशी दुपारी मध्यान्हला, सुजाता नावाच्या कुलकन्येने त्यांना वृक्ष देवता समजून मधुर खीर (पायस) खायला दिली. संध्याकाळी एका गुराख्याने त्यांना सुकलेल्या गवताची गादी अंथरूण दिली. त्याने बोधी प्राप्ति हेतु हे शुभलक्षण जाणून एका पिंपळाच्या वृक्षाखाली सुदृढ पद्मासन लावून बसले, आणि निश्चय (अधिष्ठान) केला, "जरी माझे शरीर, कातडी, माझे स्नायू, माझी हाडे गळून पडली, शरीरातील संपूर्ण रक्त सुकले पण मी ह्या आसनावरून तोपर्यंत उठणार नाही, जोपर्यंत मला संबोधी प्राप्त होत नाही. तो आर्य पर्येक्षणा करणारा व्यक्ती, स्वतः जन्म, जरा, व्याधी, मरण, सोक, संक्लेश या धम्माचा होऊन त्याचे दुष्परिणाम बघून त्याच्या विपरीत, अनुत्तर, योगक्षेम निब्बाणाचा शोध करतो.

या प्रतिज्ञे नंतर माराने उत्पन्न केलेल्या भय, भयंकर वादळ, विविध प्रलोभने याचा त्याच्या चित्तावर कोणताही प्रभाव पाडू शकले नाही, मार सेना परास्त होऊन परतली .

1. [ उदा. 1 आदयो] तेन समयेन बुद्धो भगवा उरुवेलायं विहरति नज्जा नेरञ्जराय तीरे बोधिरुक्खमूले पठमाभिसम्बुद्धो. अथ खो भगवा बोधिरुक्खमूले सत्ताहं एकपल्लङ्केन निसीदि विमुत्तिसुखपटिसंवेदी [विमुत्तिसुखं पटिसंवेदी (क.)].

अथ खो भगवा रत्तिया पठमं यामं पटिच्चसमुप्पादं अनुलोमपटिलोमं मनसाकासि -- " अविज्जापच्चया सङ्खारा, सङ्खारपच्चया विञ्ञाणं, विञ्ञाणपच्चया नामरूपं, नामरूपपच्चया सळायतनं, सळायतनपच्चया फस्सो, फस्सपच्चया वेदना, वेदनापच्चया तण्हा, तण्हापच्चया उपादानं, उपादानपच्चया भवो, भवपच्चया जाति, जातिपच्चया जरामरणं सोकपरिदेवदुक्खदोमनस्सुपायासा सम्भवन्ति -- एवमेतस्स केवलस्स दुक्खक्खन्धस्स समुदयो होति. त्याला रात्रीच्या प्रथम प्रहरी प्रतित्यसमुत्पाद- अनुलोम ( हेतू व प्रत्ययाने उत्पत्ती चे नियम ) या अनुपम अद्वितीय कारण चक्रा चा बोध झाला. अविज्या च्या कारणाने सङ्खारा, सङ्खाराचे या कारणाने विञ्ञाण, विञ्ञाण या कारणाने नामरूप, नामरूप या कारणाने सळायतन , सळायतन च्या कारणाने स्पर्श, स्पर्शाच्या कारणाने वेदना, वेदनाच या कारणाने तृष्णा, तृष्णा या कारणाने उपादान, उपादानाच्या कारणाने भव, भवाच्या कारणाने जाती ( जन्म ), जातीच्या कारणाने जरा, (म्हातारपण ) , मरण, शोक, विलाप , शारीरिक दुःख, दोमनस्सं ( मानसिक दुःख ) उत्पन्न होते ह्या प्रकारे समस्त दुःखक्खन्धा चा समुदय ( उत्पत्ती ) होते . हे जाणल्यावर त्यावेळी त्यांच्या मुखातून हे उदान प्रकटले,

अथ खो भगवा एतमत्थं विदित्वा तायं वेलायं इमं उदानं उदानेसि --

"यदा हवे पातुभवन्ति धम्मा.

आतापिनो झायतो ब्राह्मणस्स.

अथस्स कङ्खा वपयन्ति सब्बा.

यतो पजानाति सहेतुधम्म"न्ति..

सहेतु धम्म जसे आहे तसे जाणल्यावर, या कारणाने या तपस्वी ज्ञानी विद्वानाला जेव्हा धम्म नक्की प्रकट झाले तेव्हा त्याच्या सर्व सुंदर शंका दूर झाल्याने, त्याच्या सर्व तृष्णा शांत झाल्या.

अविज्जा म्हणजे लोभ, दोस, मोह या तीन हेतूमुळे होणाऱ्या तृष्णा, त्यामुळे उत्पन्न होणारे पंचखन्ध , त्यामुळे उत्पन्न होणारा दुःख समुदय, त्या रात्री या अनुपम अद्वितीय कारणचक्र ( प्रतित्यसमुत्पाद ) हा सिद्धांत, गंभीर तेने समजल्यावर ते सम्मासंबुद्ध झाले. या आधी कोणत्याही तत्व चिंतकाने यावर चिंतन केलेले नव्हते.

त्यानंतर रात्रीच्या द्वितीय ( मध्यम )प्रहराला भगवान बुद्धांनी या अनुलोम पटिलोम क्रमाने प्रतित्यसमुत्पादाचे चिंतन-मनन करताना,

" अविज्जायत्वेव असेसविरागनिरोधा सङ्खारनिरोधो, सङ्खारनिरोधा विञ्ञाणनिरोधो, विञ्ञाणनिरोधा नामरूपनिरोधो, नामरूपनिरोधा सळायतननिरोधो, सळायतननिरोधा फस्सनिरोधो, फस्सनिरोधा वेदनानिरोधो, वेदनानिरोधा तण्हानिरोधो, तण्हानिरोधा उपादाननिरोधो , उपादाननिरोधा भवनिरोधो, भवनिरोधा जातिनिरोधो, जातिनिरोधा जरामरणं सोकपरिदेवदुक्खदोमनस्सुपायासा निरुज्झन्ति -- एवमेतस्स केवलस्स दुक्खक्खन्धस्स निरोधो होती"ति.

2. [ उदा. 2] अथ खो भगवा रत्तिया मज्झिमं यामं पटिच्चसमुप्पादं अनुलोमपटिलोमं मनसाकासि -- " अविज्जापच्चया सङ्खारा, सङ्खारपच्चया विञ्ञाणं, विञ्ञाणपच्चया नामरूपं...पे.... एवमेतस्स केवलस्स दुक्खक्खन्धस्स समुदयो होती...पे.... निरोधो होती"ति.

अथ खो भगवा एतमत्थं विदित्वा तायं वेलायं इमं उदानं उदानेसि --

"यदा हवे पातुभवन्ति धम्मा.

आतापिनो झायतो ब्राह्मणस्स.

अथस्स कङ्खा वपयन्ति सब्बा.

यतो खयं पच्चयानं अवेदी"ति.

## झेन कथा -
## "रिकामे कप"

एक प्रख्यात प्राध्यापक झेन गुरूंना भेटायला गेले. त्यांना झेन व ध्यान याविषयी खूप काही वाचले होते आणि आता ते प्रत्यक्ष शिकण्याची इच्छा होती.

गुरूंनी त्यांना चहासाठी बसवले. तेव्हा प्राध्यापकांनी स्वतःच्या ज्ञानाबद्दल, त्यांनी वाचलेल्या पुस्तकांबद्दल, आणि ध्यानातील त्यांच्या कल्पनांबद्दल बोलायला सुरुवात केली.

गुरूंनी शांतपणे चहा ओतायला सुरुवात केली. कप भरला, पण ते ओततच राहिले. चहा कपातून बाहेर सांडायला लागला.

"गुरुजी, कप भरला आहे, तुम्ही अजून का ओतत आहात?" – प्राध्यापक थोडे अस्वस्थ होऊन म्हणाले.

गुरूंनी हळूच उत्तर दिले –

"तुमचा कपसुद्धा हाच आहे. तो आधीच तुमच्या कल्पना, मते आणि पूर्वग्रहांनी भरलेला आहे. जर तुम्हाला झेन ध्यान शिकायचे असेल, तर आधी तो रिकामा करावा लागेल."

शिकवण

ध्यान म्हणजे स्वतःला रिकामे करणे – आपण आधीच्या विचारांच्या ओझ्यापासून मुक्त झाल्यावरच नवे अनुभव घेऊ शकतो.

अहंकाराचा त्याग – "मी आधीच जाणतो" ही वृत्ती ध्यानात अडथळा ठरते.

संपूर्ण जागरूकता – वर्तमान क्षणात राहून, पूर्वग्रह बाजूला ठेवून, मन निरपेक्ष ठेवणे हेच खरे ध्यान.

ध्यानात उपयोग

श्वासावर लक्ष केंद्रित करणे — जुने विचार, मते, आणि तणाव हळूहळू श्वासाबरोबर सोडून द्या.

मनातील "कप" रिकामा करणे — ध्यानाच्या आधी मनात जे काही गोंधळ आहे ते हळूच निरीक्षण करा आणि सोडून द्या.

नवीनतेसाठी खुले राहणे — प्रत्येक ध्यानसत्र नवे असते; त्यामुळे पूर्वानुभवाशी तुलना करू नका

**मूळ पाली गाथा**

**दीघा जागरतो रत्ति,**
**दीघं सन्तस्स योजनं।**
**दीघो बालानं संसारो,**
**सद्धम्मं अविजानतं॥**

**शब्दशः अर्थ - दीघा = लांब, प्रदीर्घ (स्त्रीलिंगी), जागरतो = जागणाऱ्याची, निद्राहीनाची (संबंध दर्शक रूप), रत्ति = रात्र, दीघं = लांब, प्रदीर्घ (नपुंसकलिंगी / पुल्लिंगी),सन्तस्स = थकलेल्या व्यक्तीचा, योजनं = एक यात्रा, प्रवास, दीघो = लांब, प्रदीर्घ, बालानं = अज्ञानी लोकांचा (बाल = अज्ञानी, मूर्ख), संसारो = जन्ममृत्यूचा फेर, संसार, सद्धम्मं = खराखुरा धर्म, योग्य उपदेश, अविजानतं = न जाणणाऱ्यांचा, न समजणाऱ्यांचा**

**मराठी अर्थ**

**जागणाऱ्याला रात्र खूप लांब वाटते; थकलेल्या प्रवाशाला एक योजनाचा मार्ग खूप लांब वाटतो. त्याचप्रमाणे, सद्धर्म न जाणणाऱ्या अज्ञानी लोकांचा संसार फार लांब असतो.**



**भारतीय बौद्ध महासभा श्रामणेरी बौद्धाचार्या. केन्द्र शिक्षिका , महाराष्ट्र राज्य संस्कार उपाध्यक्ष, धम्मलिपि संचालिका. निवास बांद्रा. 9730568539,**
**त्रिरत्न निर्मित, 'स्वप्नकमलज इन्टरप्राइजेस' (इको फ्रेंडली क्लॉथस बॅग मेकर अॅन्ड सेलर, बौद्ध साहित्य विक्रेता.**
**आयुनी. स्वाती जगन्नाथ गायकवाड.**

सिंहाला - मृगराज म्हटले जाते. या ठिकाणी सर्व पशूंना अभयदान होते. या वनातच सिद्धार्थ गौतमावर रागवून गेलेले परिव्राजक राहत होते होते या ठिकाणी तथागत भगवान बुद्धांनी प्रथम या पंचवर्गीयांना धम्मोपदेश केले. या ठिकाणी ते तीन महिने राहिले आषाढ पोर्णिमेला त्यांनी धमचक्र प्रवर्तन केले म्हणून त्या दिवसाला गुरुपोर्णिमा म्हणतात. या तीन महिण्याच्या काळात पंचवर्गीयां बरोबर त्या रात्री 'यश' यास प्रबोधन केले. त्यानंतर त्याचे मित्र विमल सुबाहू, पुण्यजित, गवांपती यांना यशने दिक्षा घेतल्याचे समजले तेव्हा ते सुद्धा आले व धम्मदीक्षा घेतली. त्यानंतर त्याचे इतरही परिजनांनी दिक्षा घेतली. अनेकजन भगवान बुध्दांच्या प्रथम प्रबोधन कालास संघाला त्यांनी प्रथम उपदेश केला 'धम्मचक्क पवत्तन' केले त्यास वर्षावास म्हणतात. पण तेव्हा वर्षावास सुरुच झाला न्हवता. (कारण त्यापुर्वी संघ निर्मिती न्हवती) सर्व परिव्राजकांचे या काळात परिवर्तन झाले त्यांच्या विकारांचे पतन (नाश) झाला. त्यांनंतर लोकांना हा उपदेश देण्यासाठी तयार झालेला हा संघ तत्पर झाला. प्रविण झाला हे पाहून भगवान बुध्दांनी त्यांना अश्विन पोर्णिमेस इ.स.पुर्व 528 ला चारिकेचा आदेश दिला.

."चरथ भिक्खवे चारिकं बहुजन हिताय, बहुजन सुखाय ।
देसेथ भिक्खवे धम्म अदिकल्याणं,मज्जे कल्याणं, परियोसान कल्याणं , सात्थं सव्यज्जनं । ठेवलं परिपुण्ण परिसुद्ध ब्रह्मचर्यं पकासेथ ।

हे भिक्खूनों बहुजनांच्या हितासाठी सुखासाठी लोकांवर दया करण्यासाठी धम्मप्रचार, प्रसार करा .ज्याचा आधी, मध्य , व शेवट कल्याणकारक आहे त्या सद्धमाला अंगीकार करून स्वयंप्रकाशीत व्हा.

वैशाख पोर्णिमा इ.स.पु. 528 ला सिद्धार्थ गौतमाला स्व-संशोधनातूनच ज्ञान प्राप्ती होऊन ते 'सम्यक सम्बुद्ध' झाले. त्यांना जीवनातील सत्याचे ज्ञान प्राप्त झाले. हे ज्ञान सुरवातीपासून अंतापर्यंत कल्याणकारी होते. पण ते सहज समजेल ग्रहण करतील अशाच ज्ञानी लोकांना देण्याचे त्यांनी ठरवले कारण जर से समजले पण योग्य कृती घडली नाही तर कल्याण होणार नाही. त्यासाठी प्रथम त्यांनी 'आलार कालाम व उद्दक रामपुत्त' यांना ते ज्ञान देण्याचे ठरवले पण ते मृत झाल्याने त्यांनी ते ज्ञान पंचवर्गीय परिव्राजकांना देण्याचे त्यांनी ठरवले.

इ.स.पु. 528 चा प्रथम वर्षावासात त्यांनी जगाच्या कल्याणाचा मार्गलोकांपर्यंत पोहचावा यासाठी वाराणशी येथील ऋषिपतन मृगदायिनी वनात प्रथम धम्मचक्क पवत्तन केले. ऋषिपतन (इसिपतन)- इसि-ऋषी, पतन-उतरण पतन-( सामान उतरवणे, काढणे या साठी पतन शब्द होता) त्यावेळची मान्यता होती या वनात कोणी ज्ञानी पुरुष, बुद्ध ऋषि बलाने उतरतील, ज्ञान देतिल.

इसिपतन - ज्ञानी ऋषी (पुरुष) उत्तरण्याचे स्थान जेथे अनेक ऋषी मुनि एकत्र येऊन तपतात . या वनात पशुंना अभयदान होते कोणत्याही प्राण्यांची हत्या होत नसें या वनाला मृगदायिनी वन म्हटले जाते. मृग म्हणजे हरिण असा अनेकांचा समज आहे. पण या शब्दाचा अर्थ पशु-कोणत्याही पशूस मारले जात न्हवते.पुर्वी पालि-मागधी मध्ये पशूला मृग म्हणत होते-उदा. माकडास शाखामृग म्हटले जाते.

अशा प्रकारे भगवान बुद्धांकडून आदेश (आज्ञा) असल्याने हा संघ प्रचार प्रसार करण्यासाठी, लोकांना दुःखमुक्तीचा मार्ग दाखवण्यासाठी चारिका करत होता, भ्रमण करत होता, सर्वच ऋतुकाळ खंडात ते चारिका करित वर्षाऋतु ही त्याला अपवाद न्हवता. सुरवात काळात संख्या ही कमी होती त्यामुळे वर्षाऋतुतील भिक्खूंचे फिरणे, वनस्पती तुडवणे, किटकांचे पायाखाली भरडले जाणे हे लोकोंच्या लक्ष्यात आले नाही. परंतू भगवान बुद्धांच्या धम्माची सुयोग्य शिकवण त्यामुळे भिक्खुंच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली. एकाएका भिक्खुं बरोबर त्यांचा शिष्यसंघही चारिका करत असे हा संघ लहान किंवा मोठा असे त्यामुळे त्यांचे एकाच वेळी शेतातून शेती (वनस्पती तुडवणे) लोकांना लक्षात येऊ लागले.

" ये धम्मा हेतुप्पभवा, तेसं हेतु तथागत आह।
तेसंच यो निरोधो, एवंवादी महासमणो' 'ति।।

अर्थ- हेतु-प्रत्ययाने सुख-दुःखादी सर्व संस्कार उत्पन्न होतात असे तथागत सांगतात. परंतु हेतुप्रत्ययाच्या कारणांची शृंखला समजताच सुख-दुःखादी सर्व संस्कारांचा निरोध होतो, अशी त्या महा श्रमणाची शिकवणूक आहे.

भगवान बुध्दांनी वर्षावासाची सुरवात हेतुप्रत्ययाच्या कारणामुळेच केली आहे. एकाच वेळी जास्तीत जास्त शिष्यसंघाबरोबर भिक्खूं शेतातून जातो ,त्यामुळे भरास आलेली शेती तुडवली जात होती. शिवाय शेतीमधील अनेक जीवजंतू पायाखाली भरडले जात. त्यातील काही विषारी किटकदंशामुळे भिक्खुंचा संघ आजारी पडे, मृत्युमुखी पडे. तसेच पावसाळ्यामुळे नदीनाले ( उथळ असल्याने) पूर येई त्यात भिक्खू वाहून जात. तसेच एकच चिवर असल्याने ते भिजत असे त्यांना त्या ओलेत्या कपड्यातच प्रवास करावा लागे. त्यामुळे ही ते आजारी पडत. अन्य पंथाचे लोक वर्षाकाळात एकाच ठिकाणी राहत असल्याने त्यांच्याकडून हानी होत नाही, हे पाहून लोकांची कुजबूज होत होती .ते संघाची वर्षाकाळात टिका करू लागले. आपण दिलेला चारिकेचा अर्थ- दुःखमुक्तीचा मार्ग सांगणे आहे, लोकांना धम्म सांगणे आहे. असे असताना वर्गाकाळात भिक्खूंनी स्वताच प्रवास टाळून स्वरंरक्षण तसेच इतरांना उपद्रव होणार नाही हे पाहिले पाहिजे होते पण असे होत नाही म्हणून भगवान बुद्धांनी वर्षाकाळात चारिका भ्रमण न करता संघाला वर्षावास करण्याचा नियम आदेश दिला. वर्षावास सुरू करण्यास 2 पोर्णिमा आहेत. एक आषाढ दुसरी श्रावण. एकदा वर्षावास सुरु केल्यानंतर भिक्खूंनी प्रवास करू नये. फक्त काही कारणास्तव बाहेर पडण्यास परवानगी आहे.

.→👉2 वर्षावास कोणासाठी असतो ?.

वर्षावास म्हणजेच पावसाळ्यातील निवास, या काळात गृहस्थी उपासक आपल्या घरी राहतच असतो त्यांना या काळात वेगळा निवास करायची आवश्यकता नाही, मात्र चारिका करणाऱ्या भिक्खूंसाठी वर्षावास करणे हा भगवान बुध्दांनी दिलेला आदेश आहे. एका वर्षावास सुरवात केली की भिक्खूंना बाहेर जाण्याची परवानगी नसते. फक्त अपवाद परिस्थिती असेल तर ते बाहेर पडू शकतात. खालिल कारण असेल तर जाता येते.

1)उपासक-उपासिका यांनी भोजनाचे अथवा धम्मप्रवचनाचे आमंत्रण दिल्यास. धम्मप्रचाराचा एक भाग म्हणून जाता येते. 2) एखादा भिक्खू आजारी आहे हे समजल्यास त्याच्या सेवेसाठी जाता येते.

3) वर्षावास स्थळी उपद्रव निर्माण झाल्यास जसे- नैसर्गिक आपत्ती, भिती, संघभेद पुरसदृष्य स्थिती निर्माण झाल्यास ते स्थळ सोडता येते.

वर्षाकाळात उचित कारणांसाठी भिक्खूंना 7 दिवसांकरता वर्षावास स्थळ सोडता येते. 3 रे कारण जर असेल तर दुसरीकडे स्थलांतर करून वर्षावास पुर्ण करता येतो.

भगवान बुद्धांनी भिक्खूंना शिष्टाचाराचे जे नियम दिलेले आहेत. त्यात भिक्खूंनी कसे वागावे, कसे वागू नये. या संबंधिचे नियम केवळ औपचारिक न्हवते तर त्यांची या नियमा संबंधी दोषपरिक्षा न्यायपरिक्षा होत असे. यास ('पातिमोक्ख क्रिया') म्हटले जाते. हि क्रिया भिक्खू- भिक्खूणी संघात होत असते. भिक्खूसंघाविषयी जी अगदी नवीन आणि अपूर्व संस्था भगवान बुद्धांनी निर्मित केली तिला 'उपोसथ' म्हणतात. म्हणजेच भिक्खूंच्या हातून घडलेल्या अपराधाची स्विकृती हि संस्था होय. या उपोसथासाठी त्याल्या ठिकाणाच्या सर्व भिक्खूंची सभा बोलवावी लागे. पंधरावड्यात तीन सभा चतुर्दश, पंचमी, अष्टमी या दिवशी भिक्खुना उपवास करावा लागे. म्हणून कबुलिच्या दिवसाला उपोसथ म्हणतात.

या सभेत प्रमुख असलेल्या भिक्खू कडून भगवान बुद्धांनी दिलेले पातिमोक्खातील नियम वाचून दाखवले जातात.जर संघ शांत असल्यास त्यांनी नियमांचे प उल्लंघन केले नाही. जर एखादयाने उल्लंघन केले अस ल्यास त्याच्या वर आरोप ठेऊन न्यायपरिक्षा होत होती.

बदलत्या काळानुसार वर्षाकाळात पातिमोक्ख क्रिया (उपोसथ) सुरु झाले. त्यामुळे भिक्खूंना या वर्षाकाळात च नाही तर नित्य सतर्क राहते लागते. वर्षाकाळात एका स्थळावरच राहून तेथिल स्थानिक लोकांना धम्मोपदेश करणे, धम्ममार्गावर नेणे होय. त्यासाठी भिक्खूंसाठी वर्षावास महत्वाचा ठरतो. तसेच भिक्खुंची आयुमर्यादा किती हे त्यांच्या आई वडीलांकडे झालेल्या जन्माप्रमाणे ठरत नसुन त्यांच्या वर्षावासामुळे ठरते त्यांनी किती वर्षावास केले. श्रामणे भिक्खूंचे - उपसंपदा झाल्यानंतरच त्यांचे वर्षावास मोजले जातात. जर एखादया भिक्खूने दहा वर्षे प्रत्येक वर्षावास पालन केले तर त्यांच्या या दहावर्षातील काळामुळे त्यांना 'थेर' म्हटले जाते तर 20 वर्षावास केले असतील तर त्यांना 'महाथेरो' ही उपाधी मिळते इतरांना केवळ भिक्खूच म्हटले जाते.

.→👉3] बौद्ध संस्कृतीमध्ये वर्षावासाचे महत्व काय आहे?.

भगवान बुध्दांचा धम्म हा 'आचारो परमो धम्मा" म्हणजे आचरणा करण्याचा धम्म आहे. यात शीलपालनाला महत्व दिले आहे. तसेच प्रत्येक गोष्ट परिक्षण निरीक्षण करून स्विकारण्याचे स्वातंत्र्य आहे. बुद्ध पुर्वकाळातही लोक गृहत्याग करून परिव्राजक होत असत. त्यांचा कोणताही संघ न्हवता. कोणतेही विशिष्ठ ध्येय न्हवते. स्त्री पुरुष परिव्राजक एकत्र राहत. किंवा स्वतंत्र राहत किंवा एखाद्या व्यक्तीला गुरु मानून त्यांच्याजवळ राहत. नितीशास्त्र, तत्वज्ञान, गुढवाद, सृष्टी विषयावर चर्चा करत पण निश्चित प्राप्ती नव्हती.

भगवान बुद्धांच्या संघात ध्येय होते. दुःखातून मुक्त होऊन निब्बाण प्राप्त करणे. त्यासाठी नियमांची आवश्यकता आहे

बौध्द संस्कृतीमध्ये नितिशास्त्र आहे. सत्याची सदाचाराची शिकवण आहे. चिकित्सक बुद्धिने अभ्यास आहे. शीलाचरण सदाचरणास महत्व असल्यानेच हा धम्म लोकांच्या कल्याणासाठी, हित सुखासाठी असल्याने या संघाला स्वयंपरिक्षण करण्यासाठी वर्षावासाची गरज आहे.

वर्षा ऋतू काळ हा सृष्टीचा नवनिर्मितीचा कालखंड आहे. त्यामुळे चारिका करताना निसर्गनिर्मित या जीवसृष्टिला अपाय होऊ नये, उपद्रव होऊ नये. यासाठी वर्षावासाची आवश्यकता आहे.

याशिवाय चुकून जर अपराध घडला असेलतर उपोसथ हा मार्ग आहे जर अपराध अक्षम्य असेल तर संघातून बाहेर काढले जाते.

.👉- 4)वर्षाकाळात गृहस्थी उपासक / उपासिका यांचे (मानवांचे) कर्तव्य काय आहे? त्यांनी या काळात काय करावे?.

## प.पु.बोधिसत्व "डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित ग्रंथांमधील पालि भाषा, संभाषण व व्याकरण : एक अभ्यासमालिका"

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित व भाषण – पाली भाषेतील वर्णविचार
(Orthography)

१. वर्णमाला (Alphabets)
(१) स्वर (Vowels)
पाली भाषेत एकूण ८ स्वर आहेत:
अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ओ
लघु (ह्स्व / रस्स) स्वर: अ, इ, उ
दीर्घ (दीघ / दीर्घ) स्वर: आ, ई, ऊ
द्विस्वरे (Diphthongs): ए, ओ
(२) व्यंजन (Consonants)
एकूण ३३ व्यंजन आहेत:
कवर्ग: क, ख, ग, घ, ङ
चवर्ग: च, छ, ज, झ, ञ
टवर्ग: ट, ठ, ड, ढ, ण
तवर्ग: त, थ, द, ध, न
पवर्ग: प, फ, ब, भ, म
अंतस्थ: य, र, ल, व
उष्म: स, ह, ळ




२. व्यंजनांचे वर्गीकरण
मृदू (Soft) व्यंजन – प्रत्येक वर्गातील शेवटची तीन अक्षरे + य, र, ल, व, ह, ळ
→ एकूण २१ व्यंजन
कठीण (Hard) व्यंजन – प्रत्येक वर्गातील पहिली दोन अक्षरे + स
→ एकूण ११ व्यंजन

अनुनासिक (Nasal) व्यंजन – ङ, ञ, ण, न, म
३. संयुक्त व्यंजन (Conjunct Consonants)

उदा.: क्क, क्ख, क्य, क्र, क्व, ख्य, ग्ग,
ग्घ, ग्र, ङ्क, ङ्ख, ङ्ग, ङ्घ, च्च, च्छ, ज्ज,
ज्झ, ज्ञ, ञ्च, ञ्छ, ञ्ज, ञ्झ, ट्ट, ठ्ठ, ड्ड,
ण्ण, ण्ट, ण्ठ, ण्ड, त्त, त्थ, त्व, त्र, द्द, द्ध,
द्र, द्व, ध्व, न्त, न्थ, न्द, न्ध, न्न, न्ह, प्प,
प्फ, ब्ब, ब्भ, भ्य, ब्र, म्प, म्फ, म्ब, म्भ,
म्म, म्ह, य्य, यह, ल्ल, ल्य, ल्ह,
व्ह, स्स, स्म, स्व, ह्य, ह्व, ळ्ह

४. पालीतील विशेष उच्चार चिन्हे
अनुस्वार / निग्गहिता – उदा. "अहं"
विसर्ग (:) – पालीत क्वचित वापर
ऋ, ॠ, ऌ, ॡ, ऐ, औ हे स्वर पालीत नाहीत
श, ष ही व्यंजन पालीत नाहीत – स त्यांची जागा घेतो
पालीतील सर्व शब्द स्वरावर समाप्त होतात
५. उच्चार नियम
च – चहा मधील 'च'
ज – झिम्मा मधील 'ज'
झ – झकास मधील 'झ'
६. काही शब्द लिहिण्याची पद्धत
गंगा → गङ्गा
पंडित → पण्डित
लिंप → लिम्प
पंच → पञ्च
अंध → अन्ध
७. पाली अंक लिहिण्याची पद्धत
१०१ → एकाधिकं सतं / एकुत्तर सतं
२२८ → अद्धविसति द्विसतं
१२० → वीसति अधिक सतं



**वर्षावास धम्म प्रवचन मालिका २०२५**
**स्थळ: मौजे अपशिंगे (मि.), सातारा, दिनांक: ०३ ऑगस्ट २०२५, रविवार**

भारतीय बौद्ध महासभा सातारा जिल्हा अंतर्गत आयोजित वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचा कार्यक्रम मौजे अपशिंगे येथे उत्साहात पार पडला.
या कार्यक्रमाचे प्रवचनकार आयु. कुमार सुर्वे सर होते. त्यांनी “चार ब्राह्म विहार” या विषयावर मार्गदर्शन केले. विषयातून सर्वांना जीवनातील मैत्री, करुणा, मुदिता व उपेक्षा यांच्या महत्त्वाची प्रेरणा मिळाली.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपासक आयु. जितेंद्र गडकरी सर यांनी केले. बुद्धपूजा, वंदना व सूत्र पठण मुंबई श्रामणेरी बौद्धाचार्य आयुनि. शोभाताई रणबागले मॅडम यांनी केले. यावेळी उपासक आयु. जितेंद्र गडकरी सर यांनी सुमधुर मैत्री गीत सादर केले तर आयुनि. या कार्यक्रमास उपासक आयु. दीपक रणबागले व उपासक आयु. अंश रणबागले यांनी साताऱ्यावरून विशेष उपस्थिती दर्शवली. उपस्थितांनी शांतपणे धम्मश्रवण करून कार्यक्रमाचा लाभ घेतला.
शेवटी उपासक आयु. साहेबराव गडकरी व उपासक आयु. राजेंद्र गडकरी यांनी सर्वांचे आभार मानून मंगलमैत्री संदेश दिला. धम्म पालन गाथा व सरणतयं घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली द्राक्षाताई खंडकर मॅडम यांनी भीमगीत गाऊन उपस्थितांना प्रेरित केले.



## नवी मुंबईत बौद्धाचार्य प्रशिक्षण शिबीर उत्साहात पार पडले

नवी मुंबई – दि. ३ ऑगस्ट २०२५ रोजी पंचशील बुद्ध विहार, तुर्भे स्टोअर येथे आयोजित बौद्धाचार्य प्रशिक्षण शिबीर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. सर्व प्रशिक्षणार्थींनी पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून वेळेवर उपस्थिती दर्शवली. अनुभवी केंद्रीय शिक्षक व शिक्षिकांनी बौद्धाचार्यांसाठी महत्त्वपूर्ण विषयांवर मार्गदर्शन केले. उपस्थितांनी शिबीरातील धम्मामृताचा लाभ घेतला व आचारसंहितेचे पालन करत नियमित सहभाग नोंदवला. शिबिराच्या शेवटी मंगलमैत्रीच्या शुभेच्छांसह कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**धनाश्री, तळोजा फेज २ येथे घरोघरी बुद्ध वंदना कार्यक्रम**

नवी मुंबई – धनाश्री, तळोजा फेज २ परिसरात बौद्ध समाजाच्या वतीने घरोघरी जाऊन बुद्ध वंदना घेण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. स्थानिक उपासक-उपासिका यांच्या पुढाकाराने हा उपक्रम सुरू असून, परिसरातील प्रत्येक कुटुंबापर्यंत धम्माचा संदेश पोहोचविण्याचा उद्देश आहे.



या वंदनेदरम्यान पंचशील, त्रिशरण, सूत्र पठण आणि मंगलमय मैत्रीच्या शुभेच्छा देण्यात येतात. रहिवाशांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपल्या घरात आनंदाने वंदना स्वीकारली.
आयोजक मंडळाने सांगितले की, अशा उपक्रमातून परिसरातील बौद्ध बंधू-भगिनींमध्ये एकोपा, मैत्री आणि धम्माबद्दलची जागृती अधिक दृढ होईल. सब्बे सत्था सुखी होन्तु

पालि परिचय (Self-Introduction in Pali)
पालि वाक्य:
साधु! "अहं तुम्हाकं मम संनादनं कथयामि."। मम नामं रमेसो। अहं पुणे नगरे वसामि। मम पिता रमणो, माता च सरिता। अहं पाठसालायं पालिं सिक्खामि। मम आयु पञ्चविसति वस्सानि। अहं धम्मं पठामि च सुखी च भवामि। साधु, साधु!
मराठी भाषांतर:
नमस्ते! "मी तुम्हाला माझा परिचय सांगतो" . माझे नाव रमेश आहे. मी पुणे शहरात राहतो. माझे वडील रमण आणि आई सरिता आहेत. मी शाळेत पालि शिकतो. माझे वय पंचवीस वर्षे आहे. मी धम्म वाचतो आणि सुखी होतो.
हिंदी अनुवाद
नमस्ते! मैं आपको अपना परिचय देता हूँ। मेरा नाम रमेश है। मैं पुणे शहर में रहता हूँ। मेरे पिताजी का नाम रमण और माताजी का नाम सरिता है। मैं स्कूल में पालि पढ़ता हूँ। मेरी उम्र पच्चीस वर्ष है। मैं धम्म पढ़ता हूँ और सुखी होता हूँ।
English Translation
Hello! Let me introduce myself. My name is Ramesh. I live in Pune city. My father’s name is Raman and my mother’s name is Sarita. I study Pali in school. I am twenty-five years old. I read the Dhamma and I feel happy.

## बौद्ध धम्म – प्रश्न मंजुषा

प्र.१ भगवान बुद्धांचा जन्म कोणत्या दिवशी झाला?
A) चैत्र पौर्णिमा B) वैशाख पौर्णिमा
C) आषाढ अमावस्या D) कार्तिक पौर्णिमा

प्र.२ भगवान बुद्धांचे पिताचे नाव काय होते?
A) महामाया देवी B) महाप्रजापती गौतमी
C) शुद्धोधन D) असीत

प्र.३ भगवान बुद्धांचा जन्म कोठे झाला?
A) कपिलवस्तू B) लुंबिनी
C) सारनाथ D) बोधगया

प्र.४ सिद्धार्थाच्या जन्मानंतर सात दिवसांनी कोणाचे निधन झाले?
A) शुद्धोधन B) महामाया देवी
C) महाप्रजापती गौतमी D) यशोधरा

प्र.५. पाली भाषेत किती मूलभूत स्वर (Vowels) आहेत?
A) ८ B) १०
C) १२ D) ९

प्र.६ खालीलपैकी कोणता पाली भाषेतील दीर्घ स्वर आहे?
A) अ B) ई
C) उ D) ओ

प्र.७ पाली भाषेत किती व्यंजन (Consonants) आहेत?
A) ३३ B) २५
C) ३५ D) ३०

प्र.८ पाली भाषेत 'ङ' हे व्यंजन कोणत्या वर्गात मोडते?
A) तालव्य B) मूर्धन्य
C) कण्ठ्य D) ओष्ठ्य

प्र.९ खालीलपैकी कोणते अक्षर पाली भाषेत नसते?
A) क्ष B) थ
C) भ D) च

## लहान मुलांचे सदर ! चला रंग भरू या!



हे साप्ताहिक मालक, संपादक व प्रकाशक – अनिल आनंद सुरडकर | यांनी मुद्रक – जितेंद्र महादेव रसकर | मुद्रण – श्री समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, पुणे – ४११००२ येथे छापून | प्रकाशन पत्ता – हाउस नं. २, बिल्डिंग नं. ५, सर्वे नं. ०८, सातववाडी, हडपसर, पुणे – ४११०२८ येथून प्रकाशित केले |
RNI.NO – MHMUL/25/A1620 | MO.NO : +91 8805118839 / सर्व कायदेशीर बाबी पुणे न्याय क्षेत्रात येतील | "या अंकात प्रसिद्ध झालेले बातम्या व लेख या मधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही."